# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/०४/२०२४ (बुधवार) सायंकाळ**


---

## मोटरसायकल चोरी करणारा आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

दिनांक ०१/०४/२०२४ रोजी फिर्यादी नामे – श्रुतीका रविंद्र कन्हेरे, वय २१ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ तेलंगखडी सावनेर यांनी पोलीस स्टेशन सावनेर येथे तक्रार दाखल केली की, तिच्या मैत्रीणीच्या लग्नाला आपली काळया पिवळया रंगाची टी. व्ही. एस एनटॉर्क मोपेड गाडी क्र. एम. एच.– ४०/सी. यु. १०५७ ही लग्न असलेल्या हॉलच्या समोर उभी व लॉक करून लग्नाकरीता हॉल मध्ये गेली असता चोरीस गेलेली आहे. अशा त्यांच्या तक्रारी वरून पोस्टे सावनेर येथे अप क्र. ३६७/२४ कलम ३७९ भादंवि. अन्वये मोटरसायकल चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयातील आरोपीचा शोध सावनेर पोलीस घेत असता पोस्टे सावनेर हद्दीत गांधी चौक सावनेर येथे पेट्रोलींग दरम्यान एक संशयित इसम काळया पिवळया रंगाची टी. व्ही. एस एनटॉर्क मोपेड नंबर प्लेट नसलेली गाडी दिसुन आल्याने त्यास थांबवुन गाडीबाबत व गाडीचे कागदपत्राबाबत विचारपुस केली असता उडवाउडवीचे उत्तरे देवु लागला. त्यावर संशय बळावल्याने तसेच पोस्टे सावनेर येथे दाखल असलेल्या मोटरसायकल चोरीच्या गुन्हयातील चोरीस गेलेल्या गाडीचे वर्णनाशी मिळते जुळते असल्याने चोरीस गेलेल्या गाडीच्या इंजिन नंबरची पाहणी केली असता एकसारखे दिसुन आल्याने **आरोपी नामे– राजीव सदाशिवराव बनाईत, वय ३८ वर्ष, रा. मसोळा त. नरखेड जि. नागपुर हल्ली मु महाजन ले आउट सावनेर** यास ताब्यात घेवुन मोटरसायकल चोरीचे गुन्हयाबाबत सखोल विचारपुस केली असता आरोपीने गुन्हयाची कबुली दिली. आरोपीकडुन काळया पिवळया रंगाची टी. व्ही. एस एनटॉर्क मोपेड नंबर प्लेट नसलेली गाडी किंमती ५०,०००/–रू. ची जप्त करून आरोपीला अटक करण्यात आली.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक सा. नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोनि. रविंद्र मानकर, पोशि राम यादव, पोहवा सुरेंद्र वासनिक यांनी केली आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर